'A' Grade
NAAC Re-Accredied
(3rd Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

जावक क्रमांक : उमवि/८/ 04 /२०१८ दि.०२.०१.२०१८

प्रति,
मिनीटेक सिस्टीम प्रा.लि.,
पहिला मजला, पिंगळे कॉम्प्लेक्स,
घाणकर लेन, नाशिक-1

**विषय :- विद्यापीठ खरेदी आदेशानुसार साहित्याचा पुरवठा करणेबाबत.**

संदर्भ :- विद्यापीठ पत्र जा.उमवि/८/पी-०२/९५२/२०१७,दि.१२.१२.२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून,विद्यापीठ खरेदी आदेश क्र. १००००३०११, दि.०१.११. २०१७ व खरेदी आदेश क्र.१००००३११५ दि. ०८.११.२०१७ अन्वये All in one Computer, Laptop, Color Laser Printer (Automatic Duplex), Scanner, UPS online 2 KVA with Dry cell Batteries Up to 30 Min. backup साहित्याचा पुरवठा दि. 15.12.2017 पर्यंत करावा अन्यथा आपणाकडून अपुर्ण साहित्य स्विकारले जाणार नाही व निविदेतील अटी व शर्तीनुसार आपल्या कंपनीवर कार्यवाही करण्यात येईल अशा आशयाची बाब यापूर्वीच कळविण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपणास विद्यापीठ कार्यालयाकडून उपरोक्त नमूद साहित्य पुरविण्यासाठी दि.१५.१२.२०१७ पर्यंतची मुदत देऊनही खरेदी आदेशातील नमूद संपूर्ण साहित्याचा पुरवठा केलेला नाही.

आपण विद्यापीठास पुरविलेले All in one Computer-03 व Scanner-02 नग परत करण्याबाबत विद्यापीठाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे सदरचे साहित्य विद्यापीठातील संबंधित विभागांकडून संकलीत करून परत घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार, आपण भरणा केलेली सुरक्षा अनामत रु.32,581/-जप्त करण्याची कार्यवाही विद्यापीठाद्वारा करण्यात येत असून आपल्या फर्मचे नाव विद्यापीठ पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्याची कार्यवाही देखील करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यापीठाद्वारा आपणाकडून भविष्यात कोणत्याही प्रकारचे साहित्य खरेदी करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

( डॉ. भा. द. कऱ्हाड )
**वित्त व लेखा अधिकारी**

प्रत माहितीस्तव :-
मा.कुलगुरु कार्यालय,उ.म.वि.,जळगाव